## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई
## शुक्रवार दिनांक ०४/१०/२००२ रोजी झालेल्या ८२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ८२ वी बैठक शुक्रवार दि.०४/१०/२००२ रोजी दुपारी ३.३० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर | सभापती |
| २. | श्री.एस्.एस्.झेंडे | मुख्य अधिकारी |
| ३. | मा.श्री.सचिन मा.सावंत | सदस्य |
| ४. | मा.श्री.विश्वास मोकाशी, | सदस्य |
| ५. | मा.श्री.गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ६. | मा. श्री. रघुनाथ थवई | सदस्य |
| ७. | मा. श्री कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ८. | मा.श्री.रमेश परब | सदस्य |
| ९. | मा. श्रीमती छाया कल्याणी | सदस्या |
| १० | मा. श्री उस्मान गणी कुरेशी (लालीभाई) | सदस्य |
| ११ | मा.श्री.मोहन देसाई | सदस्य |
| १२ | मा.श्री.बाप्पा सावंत | सदस्य |
| १३ | मा. श्री. संजय शिर्के | सदस्य |
| १४. | मा. श्री. अबुबकर मुसा बाटलीवाला | सदस्य |
| १५. | प्रमुख अभियंता, म.न.पा. यांचे प्रतिनीधी | निमंत्रक |
| १६. | कर निर्धारक व संकलक, म.न.पा. यांचे प्रतिनिधी | निमंत्रक |

बैठकीच्या सुरुवातीस मा. सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य तसेच मंडळाचे अधिकारी व कर्मचारीवर्गाचे स्वागत करुन सचिवाना बैठकीस सुरवात करण्याच्या सूचना दिल्या.

तदनुसार सचिवांनी बैठकीस सुरुवात करण्यापूर्वी असे निदर्शनास आणून दिले की, उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग हयांनी ते पूर्वनियोजित दुस-या बैठकीमुळे मंडळाच्या आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याबाबत फॅक्स पाठवून कळविले आहे.

**बाब क्रमांक : ८१/२**

विषय- **दि.०३.०९.२००२ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या ८१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.**

---

मुं.इ.दु. व पु. मंडळाच्या दि. ०३.०९.२००२ रोजी संपन्न झालेल्या ८१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ४१ व ४१-अ ते ४१उ वर सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती मंडळाच्या दि. ०३.०९.२००२ रोजी संपन्न झालेल्या ८१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

------------ooo----------

**सहमुख्य अधिकारी/दु.व पु.मंडळ**

**बाब क्रमांक : ८२.२ (१)**

**विषय- जूनी इमारत १२९,ई, जगुशेठ चाळ, करीरोड,ना.म.जोशी मार्ग, मुंबई-१३हया जागेवर तिस-या टप्प्यांतर्गत पुनर्रचित करण्यात आलेल्या इमारतीमधील गाळे वाटप करताना व्हेकेशन नोटीस (T) भाडेकरु म्हणून असलेले नाव कमी करताना आकारण्यात येणा-या रक्कमेबाबत.**

---

सदर प्रस्ताव पृ.क्र. ४३ ते ५५ वर सादर करण्यात आला आहे.

सहमुख्य अधिकारी, दु.व पु. हयांनी सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या जागेवर आतापर्यंत एकूण ४ इमारती पुनर्रचित करण्यात आल्या आहेत. हयापैकी ३ इमारती राजीव गांधी प्रकल्पांतर्गत पुनर्रचित केल्या गेल्या आहेत व उर्वरित एक इमारत आपल्या दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत पुनर्रचित करण्यात आली आहे. राजीव गांधी प्रकल्पांतर्गत पुनर्रचित ३ इमारतीतील गाळयांचे वाटप करताना आपण त्यांच्याकडून रु.१०००/- प्रमाणे गाळा हक्क बदलापोटी शुल्क घेण्यात आले आहे. हया व्यतिरिक्त त्यांच्याकडून दरमहा रु.१८०/- प्रमाणे २५ वर्षांसाठीची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

प्राधिकरणाने दि. १५.६.९८ रोजीच्या १५१ व्या बैठकीत ठराव क्रमांक ५३२६ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार गाळा हक्क बदलापोटी आता रु.१०००/- ऐवजी रु.५०००/- शुल्क आकारावे असा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मंडळाच्या दि. २८.५.९९ रोजीच्या बैठकीतील ठराव क्रमांक ६०/४४९ नुसार १८०.०० चौ.फू. क्षेत्रफळाचा गाळा वाटप करताना मालकी हक्कापोटी रु.१७,२५५/- एकरकमी आकारण्याचा निर्णय घेतला आहे.

हयाबाबत आता दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे बांधण्यात आलेल्या चौथ्या इमारतीतील रहिवाशांच्या श्री पिंपळेश्वर स.गृ.संस्थेने त्यांच्या दि. १.८.२००२ रोजीच्या पत्रान्वये अशी विनंती केली आहे की, हया चारही पुनर्रचित इमारती एकाच कंपाऊंडमध्ये असल्याने व हयापूर्वी पुनर्रचित इमारतींना ज्याप्रमाणे गाळा हक्क बदलासाठी रु. १०००/- शुल्क आकारले आहे. व दरमहा रु. १८०/- प्रमाणे २५ वर्षांसाठी रक्कम वसूल केली आहे, त्याचप्रमाणे या इमारतीतील गाळे वाटप करावे. त्यानुसार हा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

मा.सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी तद्नुषंगाने असे मत प्रदर्शि केले की, तीन इमारतींमधील गाळयांचे वाटप ज्याप्रमाणे केले आहे त्याच धर्तीवर या चौथ्या इमारतीतीलही गाळयांचे वाटप करण्यास हरकत नसावी.

मुख्य अधिकारी, दुवपु हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, हया चारही पुनर्रचित इमारती एकाच जागेवर असल्याने व जून्या सर्व इमारती एकाच वेळी पाडल्या गेल्या असल्याने अगोदर

पुनर्रचित केलेल्या ३ इमारतींना व नंतर पुनर्रचित केलेल्या एका इमारतीस वेगवेगळे दर आकारणे योग्य नाही. हयाबाबत मा. सभापती हयांनी रहिवाशांबरोबर चर्चा झालेली आहे.

वरील सविस्तर चर्चेअंती श्री पिंपळेश्वर सह.गृह. संस्थेने केलेली विनंती मान्य करण्याचे सर्वानुमते ठरले.

---------------ooo--------------

**ठराव क्रमांक : ८२/६३२**

मुं.इ.दु.व पु.मंडळातर्फे विषयांकित जून्या इमारतीच्या जागेवर पुनर्रचित करण्यात आलेल्या इमारतीतील गाळयांचे वाटप श्री पिंपळेश्वर स.गृ.नि. संस्थेच्या रहिवाशांना करताना गाळे हक्क बदलापोटी रु. १०००/- शुल्क आकारण्यात यावे तसेच दरमहा रु.१८०/- प्रमाणे २५ वर्षासाठी रकमेची वसूली करण्यात यावी, हयास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

-------------oo-------------

**बाब क्रमांक : ८२.२ (२)**

विषय- भूतपूर्व राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत नागरी नुतनीकरण योजनेखाली पुनर्रचित इमारतीमधील गाळे वितरण करण्याबाबत पराणी सह.गृह.संस्था हयांना गाळा क्र.४, तळ मजला, धारावी, मुंबई हयांनी केलेल्या विनंतीबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र.५७ ते ६३ वर सादर करण्यात आला आहे.

सहमुख्य अधिकारी हयांनी हया प्रस्तावाच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, भूतपूर्व राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत पराणी सह.गृह.संस्थेकरिता पुनर्रचित केलेल्या इमारतीतील अनिवासी गाळा क्र.४ हा विश्वस्त ख्रिश्चन असेंब्ली हयांना वाटप केलेला आहे. हया गाळयाचे वाटप करताना त्यासाठी अनिवासी दराप्रमाणे रक्कम आकारली आहे. हयाबाबत मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) हयांनी दि.१.६.२००२ रोजी घेतलेल्या बैठकीत असे सुचविण्यात आले की, ख्रिश्चन असेंब्ली ही एक धार्मिक संस्था असून ती धार्मिक व सामाजिक कार्य करीत असल्याने सदर गाळयापोटी अनिवासी दर न आकारता तो निवासी दराप्रमाणे आकारावा तसेच ज्यावेळी हा गाळा त्यांना वितरीत केला गेला आहे त्यावेळी जो रु.११५५/- निवासी दर होता त्या दरानुसार रक्कम आकारावी. हयाबाबत निर्णय घेण्यास्तव सदर प्रस्ताव मंडळापुढे सादर करण्यात आला आहे.

मा. सभापती हयांनी अशी विचारणा केली की, हा गाळा विक्री करावयाचा असल्यास नियमानुसार आपण निवासी दराप्रमाणे रक्कम आकारु शकतो का ?

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांनी तद्नुषंगाने असे मत प्रदर्शित केले की, हया गाळयाचे वाटप निवासी दराप्रमाणे केल्यास त्यामध्ये मंडळाचे आर्थिक नुकसान होईल. त्यापेक्षा सदर गाळा अन्य व्यक्तीस अनिवासी दराप्रमाणे वाटप करणे संयुक्तिक होईल.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत हयांच्या मताशी ते पूर्णपणे सहमत असून हा प्रस्ताव आपण मंजूर करु शकत नाही. पृ.क्र.५९ वरील शासनाच्या दि. ६.९.२००० रोजीच्या पत्रातील आदेशांनुसार हा प्रस्ताव मंडळापुढे सादर करण्यात आलेला आहे. त्यामुळे एखाद्या अपवादात्मक प्रकरणात मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) हयांच्याकडे अर्जदारांनी केलेल्या विनंतीनुसार आपणांस हा प्रस्ताव मंजूर करता येणार नाही असे आपण शासनास कळवू.

पूर्तता
स.मु.अ./
दु.व पु.

मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी हयाबाबत असे सुचविले की, हा प्रस्ताव नामंजूर करण्यामागची मंडळाची भूमिका विस्तृतपणे शासनास कळवावी. त्यानुसार मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाचा निर्णय शासनास कळविताना त्यामध्ये हा प्रस्ताव नाकारण्याची कारणमीमांसा शासनास सविस्तरपणे कळविली जाईल.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, हा प्रस्ताव जर आपण मंजूर केला तर तो एकप्रकारे पायंडा पडला जाईल. तद्नुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाची हा प्रस्ताव ना मंजूर करण्याची भूमिका अगदी रास्त असून ती प्रचलित नियमांस धरुन आहे.

वरील सविस्तर चर्चेअंती विश्वस्त ख्रिश्चन असेंब्ली हयांनी निवासी दरानुसार किंमत आकारण्याची केलेली विनंती मंजूर करता येत नाही असे शासनास कळविण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८२/६३३**

विश्वस्त ख्रिश्चन असेंब्ली हयांनी परानी सह.गृह.संस्थेच्या पुनर्रचित इमारतीतील अनिवासी गाळा क्र.४ साठी निवासी दराप्रमाणे रक्कम आकारण्याची केलेली विनंती मान्य करता येत नाही असे शासनास कळविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

----------------oo---------------

**उत्तर परिमंडळ**

**बाब क्रमांक : ८२/३**

**(३)** विषय- उत्तर परिमंडळातील जून्या व मोडकळीस आलेल्या
उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ /सुधारित
नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.६५ ते १४१ वर सादर करण्यात आले आहेत.

उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई. विभागातील १५, फग/द विभागातील ४, फग/ऊ विभागातील ६ अशा एकूण २५ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. हयाशिवाय आयत्यावेळच्या विषयामध्ये मा. अध्यक्षांच्या परवानगीने उत्तर परिमंडळातील एकूण ७ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी

सादर करण्यात आली आहेत. अशाप्रकारे उत्तर परिमंडळातील एकूण ३२ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्तावित आहे.

वरील अंदाजपत्रकांच्या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती उत्तर परिमंडळातील एकूण ३२ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८२/६३४**

**उत्तर परिमंडळातील एकूण ३२ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या " परिशिष्ट-अ " प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.** ( पृ. क्र. ३३ ते ३७)

----------------oooo---------------

**दक्षिण परिमंडळ**

**बाब क्रमांक : ८२.४ (अ)**

**(अ)** विषय- नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या अपघाताबाबतच्या संदेशाची माहिती. दि.(१.९.२००२ ते दि.२७.९.२००२)

सदर माहिती पृ.क्र.१४३ वर सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी सादर केली आहे.

उपमुख्य अभियंता (दक्षिण) यांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, दि. ०१.०९.२००२ ते दि. २७.९.२००२ हया कालावधीत नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या अपघाताबाबतच्या संदेशाची माहिती सादर केली आहे. तसेच आयत्यावेळच्या विषयात मा. अध्यक्षांच्या परवानगीने दि.२७.९.२००२ ते दि. १.१०.२००२ हया कालावाधीत नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाची माहिती सादर केलेली आहे.

मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, अपघातांबाबतची माहिती सन्मा. सदस्यांना दिली जात नसल्याच्या तक्रारी पूर्वी प्राप्त झाल्या असल्याने अपघातांबाबतची माहिती सर्व सन्मा. सदस्यांना वेळोवेळी देण्याची खबरदारी घ्यावी.

मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, नियंत्रण कक्षामार्फत अपघातांबाबतची माहिती दिली जात आहे. मात्र काळबादेवी भागातील उपकरप्राप्त इ.क्र.४६८, काळबादेवी हया इमारतीला दि. २५.९.२००२ रोजी जो अपघात झाला त्याची माहिती प्रथम दूरचित्रवाणीवरुन कळली व तद्नंतर नियंत्रण कक्षातून त्याबाबतची माहिती प्राप्त झाली.

हयाबाबत मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, योगायोगाने हया अपघाताबाबतची माहिती प्रथम दूरचित्रवाणीस व पोलीस नियंत्रण कक्षास प्राप्त झाल्याने ते अपघातग्रस्त इमारतीच्या ठिकाणी प्रथम पोहोचले.

मा. सभापती हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, काळबादेवी येथील अपघातग्रस्त इमारतीबाबत वृत्तपत्रांतून मंडळाबाबत चांगली बाजू मांडण्यात आली आहे. हया अपघाताबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे ? अशी विचारणा मा. सभापती हयांनी केली.

तद्नुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) हयांनी असे प्रतिपादन केले की, सदर इमारत आपण दुरुस्तीसाठी हाती घेतली होती. इमारतीच्या काही भागाची दुरुस्ती करणे आवश्यक होते व त्यानुसार दुरुस्ती कामासाठी ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली होती. मा. आमदार, श्री. राज पुरोहित हयांनी त्यांच्या आमदार निधीतून काही निधी हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी उपलब्ध करुन दिला होता. परंतु रहिवाशांच्या सततच्या असहकार्यामुळे दुरुस्ती कामास प्रत्यक्ष सुरुवात करणे शक्य झाले नाही. काही दिवसांपूर्वी मा. आमदार श्री. राज पुरोहित हयांच्या मदतीने रहिवाशांना समजावण्याचाही प्रयत्न केला. परंतु रहिवाशांनी काम सुरु करु न दिल्याने हा अपघात घडला आहे.

मा. सदस्य श्री. मोहन देसाई हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, ज्याठिकाणी रहिवाशी सहकार्य करीत नाहीत अशा ठिकाणी पोलीसांची मदत घेऊन कार्यवाही करणे आवश्यक वाटते. तद्नुषंगाने का.अ./डी-१ विभाग हयांनी असे प्रतिपादन केले की, आपण अशावेळी संबंधित पोलीस ठाण्याला पत्राव्दारे कळवित असतोच. मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, शक्यतो आपण रहिवाशांना मंडळास सहकार्य करण्याबाबत वारंवार विनंती करीत असतो.

वरील सविस्तर चर्चेअंती नियंत्रण कक्षात प्राप्त झालेल्या संदेशाबाबतची नोंद सर्वानुमते घेण्यात आली.

------------oo------------

**बाब क्रमांक : ८२.४ (ब)**

**विषय- उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास पुनःप्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

सदर प्रस्ताव पृ.क्र. १४५ वर सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दि. १.११.२००१, का.अ./सी १-२ विभाग हया कार्यालयाच्या अखत्यारितील उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या अंदाजपत्रकास मंडळाच्या दि. १५.९.२००१ रोजीच्या बैठकीत रु. ३.८१ लक्ष रक्कमेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली होती. तद्नंतर निविदा मागवून हे काम मे. एच्.जे.मर्चंट हया ठेकेदारास देण्यात आले होते. परंतु त्यांचे निधन झाल्याने तद्नंतर नव्याने निविदा मागविण्यात आल्या आहेत. हया कामासाठी प्रदान केलेल्या प्रशासकीय मंजूरीची मुदत ३१.१०.२००२ पर्यंतच असल्याने व सदर काम करण्यास वाढीव कालावधी लागत असल्याने मंडळाने पूर्वी दिलेल्या प्रशासकीय मंजूरी रक्कम रु. ३.८१ ला पुनः प्रशासकीय मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

सविस्तर चर्चेअंती सी १-२ विभागातील उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या अंदाजपत्रकास रक्कम रु. ३.८० लक्षास पुनः प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८२/६३५**

दि. १.११.२००१ ते ३१.१०.२००२ हया कालावधीकरिता सी १-२ विभागातील उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या अंदाजपत्रकास रु. ३.८० लक्ष रक्कमेस पुनः प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक : ८२.४ (क)**

**विषय- इ .क्र.३०, इस्लामपूरा स्ट्रीट, मुंबई-४०० ००४ संरचनात्मक दुरुस्तीसाठी देण्यात आलेल्या प्रशासकीय मंजूरीची मुदत पुढील ५ वर्षाच्या कालावधीसाठी वाढविण्याबाबत.**

सदर प्रस्ताव पृ.क्र. १४५ वर सादर करण्यात आला आहे.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या दुस-या टप्प्याच्या दुरुस्तीच्या नकाशे व अंदाजपत्रकास मंडळाच्या दि. २७.६.९७ रोजीच्या बैठकीत रक्कम रु. १,४५,८७५/- (रु. ५५५.६७ प्रति चौ.मी. दराने) प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. तद्नंतर रितसर निविदा मागवून दुरुस्तीचे काम मे. गुलाब ॲन्ड सन्स हयांना सुरु करण्याचे आदेश दि.५.१.९७ रोजी देण्यात आले. परंतु रहिवाशांच्या असहकार्यामुळे दुरुस्ती काम सुरु होऊ शकले नाही.

आता रहिवाशांनी त्यांच्या दि. २९.६.२००२ रोजीच्या पत्रान्वये इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरु करण्याची विनंती केली आहे. ठेकेदार मे. गुलाब ॲन्ड सन्स हयांनी हे काम जून्या स्विकृत निविदेच्या दरानुसार करण्याची तयारी दर्शविली आहे. परंतु प्रशासकीय मंजूरीची मुदत २६.०६.२००२ रोजी संपली आहे. त्यामुळे प्रशासकीय मंजूरीची मुदत पुढील ५ वर्षापर्यंत वाढविणे आवश्यक आहे व त्यासाठी हा प्रस्ताव मंडळाच्या मंजूरीस्तव सादर केला आहे.

वरील सविस्तर चर्चेअंती प्रशासकीय मंजूरीची मुदत पुढील ५ वर्षापर्यंत वाढवून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक : ८२/६३६**

इ .क्र.३०, इस्लामपूरा स्ट्रीट, मुंबई-४०० ००४ हया इमारतीच्या दुस-या टप्प्याच्या दुरुस्तीच्या नकाशे व अंदाजपत्रकांना मंडळाच्या दि. २७.६.९७ रोजीच्या बैठकीत प्रदान करण्यात आलेल्या

प्रशासकीय मंजूरीची मुदत पुढील ५ वर्षापर्यंत (दि. २६.६.२००७ पर्यंत) वाढवून देण्यास सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

-----oo-----

**बाब क्रमांक : ८२.४ (ड)**

विषय- **दक्षिण परिमंडळातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

सदर प्रस्ताव पृ.क्र. १४९ ते १७७ वर सादर करण्यात आले आहेत.

उपमुख्य अभियंता (द.) हयांनी सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील **अे** विभागातील १, **बी**. विभागातील ३, **सी ३-४** विभागातील २, **डी-१** विभागातील ४ व **डी-२** विभागातील १ अशी एकूण ११ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. हयाशिवाय आयत्यावेळच्या विषयात मा. अध्यक्षांच्या परवानगीने दक्षिण परिमंडळातील एकूण ११ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. अशाप्रकारे दक्षिण परिमंडळातील एकूण २२ इमारतींच्या दुरुस्ती कामाची मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

वरील अंदाजपत्रकाच्या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकूण २२ इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८०/६३७**

**दक्षिण परिमंडळातील एकूण २२ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या "परिशिष्ट-ब" प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.** (पृ. क्र. ३९ ते ४३)

-----ooo-----

**बाब क्रमांक : ८२.५**

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी ठेवावयाचे विषय**

**का.अ./स.सं.कक्ष**

अ) विषय- १) मिरींडा चाळ, इ. क्र. २९९, अे,जे.के. सावंत मार्ग, दादर मुंबई-४०००२८ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित मिरींडा चाळ, स.गृ.नि.संस्थेकरिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याच्या प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

२) संघवी सदन, इ. क्र. २१, खेतवाडी, ४थी गल्ली, मुंबई-०४ येथील भूखंड व त्यावरील इमारतीस नियोजित संघवी सदन स.गृ.नि.संस्थेकरिता कलम १०३ ब अन्वये भूसंपादन करण्याच्या प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

---

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने का.अ.(स.सं.कक्ष) श्री आर.मोहन हयांनी असे प्रतिपादन केले की, वरील दोन्ही प्रस्तावांमध्ये नियमानुसार ७० टक्के रहिवाशांची संमती असून सदर प्रस्ताव शासनाकडे भूसंपादन कार्यवाही सुरु करण्यास मंजूरी देण्यासाठी सादर करावयाचे आहेत.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित दोन्ही प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : ८२/६३८**

म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम १०३ बी अन्वये खालील प्रस्ताव शासनाकडे भूसंपादन कार्यवाही सुरु करण्याच्या मंजूरीसाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१) मिरींडा चाळ, इ. क्र. २९९, अे,जे.के. सावंत मार्ग, दादर मुंबई-४०००२८.
(मिरींडा चाळ, स.गृ.नि.संस्था)

२) संघवी सदन, इ. क्र. २१, खेतवाडी, ४थी गल्ली, मुंबई-४०० ००४.
(संघवी सदन स.गृ.नि.संस्था)

-----------oo-------------

ब) विषय- **मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे प्रस्ताव.**

---

मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचे खालील ७ प्रस्ताव आयत्या वेळच्या विषयामध्ये मा. अध्यक्षांच्या परवानगीने मंजुरीसाठी सादर करण्यांत आले.

१. भुकर पहाणी क्र.१३/७४, परेल शिवडी विभाग, विभाग क्र..एफ.एस.५६५ (२) इ.क्र.१२, डॉ.बी.ए. रोड, आईमाई मेरवानजी स्ट्रीट, परेल, मुंबई येथील "जेर व्हीला" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२. अंतिम भूखंड क्र.८६, नगररचना योजना क्र.३, माहिम विभाग, विभाग क्र. जीएन- ४१४३ (१) इ.क्र. १९, सखाराम कीर रोड, माहीम, मुंबई येथील "प्रल्हाद निवास" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

३. भुकर पहाणी क्र.३२४ गिरगांव विभाग, विभाग क्र. डी-५७४ इ.क्र.३५-३५ए, ३७-३९, ४१-४३, तात्या घारपूरे पथ, गिरगांव, मुंबई येथील " जयराम कांजी चाळ " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

४. भुकर पहाणी क्र.१४२९,लोअर परेल विभाग, अंतिम भूखंड क्र. ४९३, नगररचना योजना क्र.४, माहीम विभाग, विभाग क्र. जी(एन)-३२७६ (७) ३२७६ (५), ३२७६ (२-३), ३२७६ (८) व ३२७६ (४), इ.क्र. ६७, ६७एफ, ६७ जीबी व ७४० ए / ६७ डी भवानी शंकर रोड, दादर (प) मुंबई येथील "कुंवरजी वाडी " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

५. भुकर पहाणी क्र.५८६ भायखळा विभाग, विभाग क्र.ई- ७७०३(२), इ.क्र.७,व्हिक्टोरिया रोड,दुसरी छेद गल्ली, भायखळा, मुंबई येथील " धोतीवाला कंपाऊंड " म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

६. भुकर पहाणी क्र.११६/१० माटुंगा विभाग भूखंड क्र. ११७ दादर माटूंगा इस्टेट विभाग क्र. एफ एन- ७२४९ (१) इ.क्र.७१, हिन्द कालनी रोड नं.५, दादर (पू) मुंबई येथील " आशिर्वाद " म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

७. भुकर पहाणी क्र.४/५९३, मलबार कंबाला हिल विभाग, उपकर क्र.डी-३३२५ (१) इ.क्र. १४, नेपीयनसी रोड, मलबार हिल, डी. विभाग, मुंबई येथील " नूरी कॅसल " म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

उपरोक्त सर्व प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सदर पुनर्विकासाच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, हया सर्व प्रस्तावांमध्ये हया नियमाप्रमाणे ७० टक्के भाडेकरू / रहिवाश्यांची संमत्ती असून मालमत्ताधारक/ मुखत्यारपत्रधारक / विकासक हयांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. तसेच क्षेत्रीय अधिका-यांनी रहिवाश्यांची यादी , त्यांच्या गाळयांचे क्षेत्रफळ, जुन्या इमारतींचे नकाशे तसेच अपरिवर्तनीय संमत्तीपत्रे तपासून प्रमाणित केलेली आहेत. त्यामुळे सदर प्रस्ताव, प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तीवर ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास हरकत नाही.

सविस्तर चर्चेअंती मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी अ.क्र.१ते ७ वर सादर केलेल्या प्रस्तावांना, प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांकः ८२/६३९**

मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी मालमत्ताधारक/मुखत्यारपत्रधारक/विकासक हयांच्याकडून प्राप्त झालेल्या खालील ७ प्रस्तावांना प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भुकर पहाणी क्र.१३/७४, परेल शिवडी विभाग, विभाग क्र..एफ.एस.५६५ (२) इ.क्र.१२, डॉ.बी.ए. रोड, आईमाई मेरवानजी स्ट्रीट, परेल, मुंबई येथील "जेर व्हीला"

२. अंतिम भूखंड क्र.८६, नगररचना योजना क्र.३, माहिम विभाग, विभाग क्र. जीएन- ४१४३ (१) इ.क्र. १९, सखाराम कीर रोड, माहीम, मुंबई येथील "प्रल्हाद निवास"

३. भुकर पहाणी क्र.३२४ गिरगांव विभाग, विभाग क्र. डी-५७४ इ.क्र.३५-३५ए, ३७-३९, ४१-४३, तात्या घारपूरे पथ, गिरगांव, मुंबई येथील "जयराम कांजी चाळ"

४. भुकर पहाणी क्र.१४२९,लौअर परेल विभाग, अंतिम भूखंड क्र. ४९३, नगररचना योजना क्र.४, माहीम विभाग, विभाग क्र. जी(एन)-३२७६ (७) ३२७६ (५), ३२७६ (२-३), ३२७६ (८) व ३२७६ (४), इ.क्र. ६७, ६७एफ, ६७ जीबी व ७४० ए / ६७ डी भवानी शंकर रोड, दादर (प) मुंबई येथील "कुंवरजी वाडी"

५. भुकर पहाणी क्र.५८६ भायखळा विभाग, विभाग क्र.ई- ७७०३(२), इ.क्र.७,व्हिक्टोरिया रोड,दुसरी छेद गल्ली, भायखळा, मुंबई येथील "धोतीवाला कंपाऊंड"

६. भुकर पहाणी क्र.११६/१० माटुंगा विभाग भूखंड क्र. ११७ दादर माटूंगा इस्टेट विभाग क्र. एफ एन- ७२४९ (१) इ.क्र.७१, हिन्द कालनी रोड नं.५, दादर (पू) मुंबई येथील "आशिर्वाद"

७. भुकर पहाणी क्र.४/५९३, मलबार कंबाला हिल विभाग, उपकर क्र.डी-३३२५ (१) इ.क्र. १४, नेपीयनसी रोड, मलबार हिल, डी. विभाग, मुंबई येथील "नूरी कॅसल"

------------oo------------

मा. सभापती हयांनी तद्‌नंतर असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या दि. ४.६.२००२ रोजी संपन्न झालेल्या ७८ व्या बैठकीत इ.क्र.३३६-३३६ बी, बनातवाला चाळ क्र.१, गणपतराव कदम मार्ग, ग/दक्षिण विभाग ही इमारत म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३)(अ) प्रमाणपत्रान्वये घोषित करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. परंतू सदर संपूर्ण इमारत रस्ता रुंदीकरणात जात असल्याने हा प्रस्ताव पुढे ढकलण्यात आला होता. परंतु आता सदर इमारतीत रहिवाशांनी त्यांना व्हेकेशन नोटीसा देण्याची विनंती केली असल्याने सदर इमारत ८८ (३)(अ) प्रमाणपत्राखाली घोषित करण्यास हरकत नसावी.

*पूर्तता का.अ, ग/द विभाग*

चर्चेअंती सदर इमारत म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८८ (३)(अ) प्रमाणपत्रान्वये घोषित करण्यास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले व त्याबाबतचा अनुपालन अहवाल पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे निदेश देण्यात आले.

**ठराव क्रमांक : ८२/६४०**

इ.क्र.३३६-३३६ बी, बनातवाला चाळ क्र.१, गणपतराव कदम मार्ग ही इमारत ८८ (३)(अ) प्रमाणपत्राखाली घोषित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

------------oo------------

बैठकीत चर्चेच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी हयांनी उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांना असे आदेश दिले की, बावला कंपाऊंडची पुनर्रचना योजना हाती घेतल्यानंतर रु.२.३६ लक्ष दुरुस्तीसाठी अपवादात्मक बाब म्हणून खर्च केले असल्याने त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो मंडळाच्या बैठकीपुढे सादर करावा. हयाबाबत लेखा विभागाचेही अभिप्राय घेण्यात यावेत. तसेच सविस्तर प्रस्ताव करताना तो मिळकत व्यवस्थापक (सं.गा.) हयांच्याशी सल्लामसलत करुन प्रस्ताव सादर करावा.

पूर्तता उ.मु.अ./ पुनर्रचना

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या पुनर्रचनेबाबत रहिवाश्यांकडून उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे शपथपत्र लिहून घेतले आहे की, त्यांनी जर मंडळास सहकार्य केले तर मंडळामार्फत दुरुस्तीचे काम केले जाईल. त्यामुळे हया प्रस्तावाशी उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांचा संबंध आहे.

मा. सदस्य श्री. संजय शिर्के हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, ज्यावेळी रहिवाशांकडून शपथपत्र लिहून घेतले त्यावेळी त्यांना दुरुस्तीचे पैसे रहिवाश्यांना भरावे लागतील अशी कल्पना देण्यात आलेली नव्हती. रहिवाश्यांना फक्त एवढेच सांगण्यात आले की, तुमचे मंडळाला सहकार्य हवे आहे व त्यासाठी शपथपत्र लिहून द्यावे व त्यानुसार रहिवाशांनी शपथपत्र दिले आहे. तसेच त्यावेळचे उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयानी रहिवाशांना दुरुस्तीबाबत जे पत्र पाठविले होते त्यामध्येही दुरुस्तीसाठीची रक्कम रहिवाशांना भरावी लागेल असा उल्लेख केलेला नाही. हयामुळे पुनर्रचना योजना रखडण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की,दुरुस्तीसाठी खर्च झालेल्या पैशाच्या वसुलीचा मुद्दा हा निवासी लेखा परिक्षकांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे हा मुद्दा तपासून त्याबाबत आपणांस निर्णय घ्यावा लागणार आहे तसेच दुरुस्तीच्या पैशाच्या वसुलीच्या मुद्दयामुळे पुनर्रचना योजना रखडण्याचा प्रश्न उद्भवत नाही. हयाबाबत आपण स्वतंत्रपणे निर्णय घेऊ. दरम्यानच्या कालावधीत पुनर्रचनेची कार्यवाही चालू राहणारच आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी हयाबाबत असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मागील बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे रहिवाशांच्या संमतीने सुधारित नकाशे तयार करुन त्यास म.न.पा.ची मंजूरी घेण्यात आली आहे. वास्तुशास्त्रज्ञांनी पुनर्रचना योजनेचे अंदाजपत्रक सादर केले असून लवकरच निविदा मागवून पुनर्रचनेच्या कामास सुरुवात करण्याची कार्यवाही चालू आहे.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. अध्यक्ष/प्रा. हयांच्या हस्ते हया पुनर्रचना योजनेचा भूमिपूजन समारंभ होऊन एक वर्षापेक्षाही जास्त कालावधी झाला आहे. तद्नंतर आपण रहिवाशांच्या इच्छेनुसार नकाशे सुधारित केले आहेत. त्यामुळे येथून पुढे तरी हया पुनर्रचना योजनेच्या कामास गती प्राप्त होणे आवश्यक आहे. बावला कंपाऊंड व पटेल बिल्डिंग हया इमारतींची पुनर्रचना प्राधान्याने राबविण्यापाठीमागचा आपला असा हेतू आहे की, हया पुनर्रचना योजनांमधून मंडळास मोठया प्रमाणात अतिरिक्त गाळे उपलब्ध होणार आहेत. ज्यामुळे बृहतसूचीवरील ३०० ते ३५० रहिवाशांना आपण हया ठिकाणी होणा-या पुनर्रचित इमारतीत सामावून घेऊ शकणार आहोत. त्यामुळे हया पुनर्रचना योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्यावर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. त्यांनी पुढे असे नमूद केले की, पटेल बिल्डिंगमधील रहिवाशांना आपण अक्षरशः

पोलीसांच्या गाडीत टाकून त्यांच्या जागा खाली करुन घेतल्या. मात्र तेथील अनिवासी गाळेधारकांनी त्यांच्या जागा खाली न केल्याने आपण एक वर्षापासून पुनर्रचनेच्या कामास सुरुवात करु शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे हयाबाबत लक्ष केंद्रीत करुन हया पुनर्रचना योजना लवकरात लवकर पूर्ण करणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधी हया नात्याने जेव्हा रहिवाशी आमच्या विनंतीनुसार गाळे खाली करतात तेव्हा जर पुनर्रचनेचे काम शीघ्रतेने झाले नाही तर सामान्यजनांचा आमच्यावरचा विश्वास उडतो. त्यामुळे हयाबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, पटेल बिल्डिंग मधील अनिवासी गाळेधारकांच्या नावात बदल करणे आवश्यक होते तसेच त्यांच्या गाळयांच्या क्षेत्रफळाबाबत वाद आहे. हा प्रश्न सहमुख्य अधिकारी हयांच्याशी निगडीत असून त्यांनी जर हा मुद्दा सोडविला तर अनिवासी गाळेधारक त्यांच्या जागा त्वरित खाली करुन देतील.

सहमुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत छाननी चालू असून लवकरच निर्णय घेण्यात येत आहे.

मा.सभापती हयांनी तदनंतर असे आदेश दिले की, हया मंडळामार्फत आतापर्यंत ज्या इमारतींची दुरुस्ती, पुनर्रचना झाली आहे, किती रहिवाशांना पुनर्रचित इमारतीतील गाळयांचे वाटप केले आहे इत्यादी माहिती द्यावी, जेणेकरुन सामान्य जनतेला हया मंडळामार्फत झालेल्या कामांची माहिती देता येईल. तसेच स्थानिक सदस्यांना संबंधित इमारतीबाबतच्या कार्यक्रमाच्या वेळी बोलाविण्यात यावे. मध्यंतरीच्या काळात निधी अभावी हया मंडळाबद्दल बराच अपप्रचार केला गेला. वास्तविक आपण निधी उपलब्ध करुन करुन घेण्यासाठी अथक प्रयत्न करुन निधी मिळविला असून आता कामांना गती प्राप्त झाली आहे. त्यामुळे मंडळामार्फत जी कामे केली जातात त्याची कल्पना सामान्य जनतेला कळणे आवश्यक आहे.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तद्नंतर असे प्रतिपादन केले की, अद्यापही पुनर्रचना विभागास निधीची आवश्यकता आहे. पुनर्रचना विभागास फक्त ५ कोटी रुपयांचा निधी दिला होता. हयामधून प्रलंबित देयकांची अदायगी केली असून अद्यापही जवळजवळ १.५० ते २.०० कोटी रक्कमेची देयके प्रलंबित आहेत.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, पुनर्रचना विभागाने केलेल्या मागणीपेक्षा १.५० ते २.०० कोटी रुपये कमी निधी देण्यात आला होता ही वस्तुस्थिती आहे. हया पाठीमागे आपला एवढाच उद्देश होता की, जून्यात जूनी देयके अदा केली जावीत. मंडळाला एकूण २२.०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून आतापर्यंत फक्त १२.५० कोटी रुपये निधी मिळाला आहे. उर्वरित ९.५० कोटी रुपयांचा निधी लवकरच प्राप्त होणार आहे व हा उर्वरित निधी प्राप्त झाल्यानंतर पुनर्रचना विभागास आणखीन निधी उपलब्ध करुन दिला जाईलच. मात्र निधी अभावी चालू असलेली कामे बंद पडू नयेत हयाबाबत दक्षता घेण्यात यावी.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, निधी अभावी कोणतेही काम थांबविण्यात आलेले नाही. सर्व कामे सुरळीतपणे प्रगतीपथावर आहेत.

मा.सभापती हयांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, नवीन पुनर्रचित इमारत पूर्ण होऊनही रु. २.५० ते ३.०० लक्ष म.न.पा.कडे जमा न केल्याने आपण इमारतीतील गाळे वाटप करु शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. वास्तविक अशी देयके अग्रक्रमाने अदा करण्याचे मागील बैठकीत ठरले होते. तरी याबाबत संबंधितांनी जातीने लक्ष घालावे व त्वरित कार्यवाही करावी असे निदेश मा. सभापती यांनी दिले.

मुख्य अधिकारी हयांनी असे प्रतिपादन केले की, मा. मंत्री, (गृहनिर्माण) हयांनी अफझलपूरकर समितीबाबत बोलाविलेल्या बैठकीमध्ये त्यांच्या विभागातील चार इमारतींबाबत तक्रार केली असून त्यानुसार इमारतींची कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. परंतु उर्वरित कामांस ठेकेदार गती देत नाही. हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे? अशी विचारणा उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांना केली.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, सदर इमारत १३४-१३६ चापशी बिल्डिंग, माझगांव, ई.विभाग असून हया इमारतीच्या मागील भागात एक गोडाऊन आहे. हया गोडाऊनच्या मालकाने न्यायालयात प्रकरणे दाखल केल्याने इमारतीचा मागील भाग खाली करता आलेला नाही. तसेच इमारतीच्या समोरील भागात काही दुकाने आहेत. हया दुकानदारांनी त्यांचे गाळे खाली न केल्यामुळे इमारतीचा समोरील भागही खाली करता आलेला नाही. इमारतीचा मधील भाग खाली करुन घेऊन पाडला आहे. हयामुळे ही जागा गेल्या १३-१४ महिन्यांपासून ठेकेदाराला काम सुरु करण्यास देता आलेली नाही. ठेकेदाराने तदनंतर असे कळविले होते की, त्याचा करारपत्रातील ३/४ कालावधी संपला असल्याने तो हे काम करु इच्छित नाही व त्यामुळे त्याने त्याला हया कामातून मुक्त करण्याची विनंती केली होती. हया ठेकेदाराबरोबर बैठक घेतल्यानंतर सदर ठेकेदाराने हे काम करण्याचे आता मान्य केले आहे.

यावर मुख्य अधिकारी हयांनी उपमुख्य अभियंता (पुनर्र.) व संबंधित कार्यकारी अभियंता हयांना असे आदेश दिले की, हया ४ इमारतींबाबतची नेमकी वस्तुस्थिती उपमुख्य अभियंता (पुनर्र.) किंवा संबंधित कार्यकारी अभियंता हयांनी व्यक्तीशः मा. मंत्री (गृहनिर्माण) हयांना द्यावी.

मा. सदस्य श्री. रमेश परब हयांनी तद्नंतर असा मुद्दा उपस्थित केला की, दादर येथे काकासाहेब गाडगीळ मार्गावरील खेड गल्ली येथे काचवाला बिल्डिंग हया इमारतीचे काम दोन वर्षांपूर्वी झपाटयाने सुरु होते. परंतु गेल्या वर्षापासून सदर काम बंद आहे. हे काम निधीअभावी बंद पडले आहे किंवा काय ? त्यामुळे त्यांनी हयाची नेमकी वस्तुस्थिती काय आहे अशी विचारणा केली.

मा. सदस्य श्री. रघुनाथ थवई हयांनी हयाबाबत असे निदर्शनास आणून दिले की, मुंबई मंडळाचे सदस्य मा. श्री. उमाशंकर ओझा हयांनी मा. सभापती हयांच्याशी चर्चा केली आहे. हया इमारतीचे काम जवळजवळ पूर्ण झाले आहे. तरीसुध्दा हया इमारतीतील गाळे वाटपास का विलंब होत आहे ? अशी त्यांनी विचारणा केली.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळाला निधी प्राप्त झाला असून हया इमारतीचे काम सुरळीतपणे चालू आहे. इमारतीचे मुख्य काम पूर्ण झाले असून फिनिशिंगचे काम चालू आहे, जे येत्या ५-६ महिन्यात पूर्ण होईल.

वर्षांपासून रहात असतात व त्यामुळे अशाप्रकारे शुल्क आकारणे अगदी चुकीचे आहे. कारण मंडळाने पुनर्रचित केलेल्या इमारतीतील गाळे हे आपण विनाशुल्क वाटप करतो. हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे? अशी विचारणा मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी हयांनी केली.

मुख्य अधिकारी हयांनी तद्नुषंगाने असे प्रतिपादन केले की, २२५.०० चौ.फू. क्षेत्रफळापेक्षा जर जास्त क्षेत्रफळाचा गाळा असेल तर अशा २२५.०० चौ.फू. पेक्षा जास्त क्षेत्रफळाची जागा आपण जास्तीच्या क्षेत्रफळापोटी शुल्क आकारुन वाटप करतो.

तद्नुषंगाने मिळकत व्यवस्थापक (पु.गा.) हयांनी असे प्रतिपादन केले की, पुनर्विकास योजनेंतर्गत उपलब्ध होणारे अतिरिक्त गाळे वाटप करताना आपण रु. २३५/- प्रति चौ.फूट दराने शुल्क आकारुन गाळे वाटप करतो व ही पध्दती अगदी सुरुवातीपासूनच आहे.

मा. सभापती हयांनी तद्नुषंगाने सविस्तर माहिती स्पष्टीकरणासह मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्याचे आदेश मिळकत व्यवस्थापक (पु.गा.) हयांना दिले.

बैठकीच्या अखेरीस मा.सभापती हयांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्य, मंडळाचे अधिकारी व कर्मचारी वर्ग हयांचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहिर केले. तसेच मंडळाची पुढील बैठक बुधवार दि.३०.१०.२००२ रोजी दु.३.०० वाजता घेण्यात येईल असे जाहिर केले.

सचिव/ दु.व पु.मंडळ

मुख्य अधिकारी / मुं.इ.दु. व पु.मंडळ

मा. सभापती/ मुं.इ.दु. व पु.मंडळ

## परिशिष्ट "अ"

**मंडळाच्या दिनांक ४/१०/२००२ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यांत आलेल्या उत्तर परिमंडळातील अंदाजपत्रकाची यादी.**

| अ.क्र | विभाग | वर्गवारी | इमारतीचे नांव | दुरुस्ती टप्पा<br>---------------<br>मंडळ/ना.ह.प्र | मजले<br>-----------<br>भाडेकरु<br>नि+अनि=एकूण | क्षेत्रफळ चौ.मी.<br>----------------<br>दर चौ.मी.चा खर्च | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम<br>------------------<br>निव्वळ टप्प्याची रक्कम | रु.१०००/-प्रति चौ.मी.मंजुरी करीता प्रस्तावित रक्कम | रु.१०००/-प्रति चौ.मी.जास्त असलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. |
| १. | ई | अ | ७-७अे, क्लेअर रोड, नागपाडा, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ+३+४अंशतः<br>१३ + ० = १३ | १९४८.३०<br>४३१.०३ | ८३९७८२/-<br>७४८५६७/- | ७४८५६७/- | -- | मंजूर |
| २. | -"- | -"- | १२२-१२२अे, व्हिक्टोरिया क्रॉस रोड (संत सावता मार्ग), माझगांव, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ+ १<br>६+ ० = ६ | १४१६.५२<br>३९२.०० | ५५४९११/-<br>४१६४०७/- | ४१६४०७/- | -- | -"- |
| ३. | -"- | -"- | २०५, तांबावाला बिल्डींग, दत्ताराम लाड मार्ग, (२०३-२१३ काळाचौकी रोड), मुंबई | तिसरा टप्पा<br>मंडळ | तळ+३+४अंशतः<br>८५+११ =९६ | २८४२.३०<br>८४६.११ | २४०८८८६/-<br>७५९११२/- | ७५९११२/- | -- | -"- |
| ४. | -"- | -"- | ३३९-३४१, रे रोड, माझगांव, मुंबई | चौथा टप्पा<br>मंडळ | तळ+ ४<br>२६+ २ = २८ | १३८१.३५<br>९३६.५८ | १२९३७४४/-<br>६५२५७४/- | ६५२५७४/- | -- | -"- |
| ५. | -"- | -"- | ५०-५२-५८-६२, हबीब बिल्डींग, डिमटिमकर रोड, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ+ १<br>२५+ १० = ३५ | ९२९.५५<br>८५०.५४ | ७९०६१७/-<br>६३२९२५/- | ६३२९२५/- | -- | -"- |
| ६. | -"- | -"- | १०,शेवकर बिल्डींग,हाथीबाग, डी.एन.सिंग रोड, माझगांव, मुंबई | दुसरा टप्पा<br>मंडळ | तळ+ २<br>१२+ २ = १४ | २७८.००<br>१३३६.६५ | ३७१५८९/-<br>२६०८३२/- | १६७२४३/- | ९३,५८९/- | -"- |
| ७. | -"- | -"- | १२३, टँक स्ट्रीट, नागपाडा, मुंबई | तिसरा टप्पा<br>मंडळ | तळ+ ३<br>३१+ ९ = ४० | ८७५.८०<br>१०६०.९२ | ९२९१५४/-<br>४३२०७४/- | ४३२०७४/- | -- | -"- |
| ८. | -"- | -"- | २५-२७, ताहिर मंझील, मस्तान टँक रोड, नागपाडा, मुंबई | तिसरा टप्पा<br>मंडळ | तळ+ ४<br>१२+ २ = १४ | ५४७.१२<br>११९०.५४ | ६५१४१९/-<br>२५७४९९/- | १,५३,२००/- | १,०४,२९९/- | -"- |
| ९. | ई | क | ११३, सेठ मोतीशा लेन, (लव्ह लेन), भायखळा (पुर्व), मुंबई | तिसरा टप्पा<br>मंडळ | तळ+३+४अंशतः<br>२४+ ११ = ३५ | १८३२.८२<br>८४२.९० | १५४४८८३/-<br>१०३०८५३/- | १०३०८५३/- | -- | -"- |

२४१

5190923

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०. | -"- | अ | १७-१७अे-बी, बदलु रंगारी स्ट्रीट, मदनपुरा, मुंबई | तिसरा टप्पा मंडळ | तळ+ १<br>३७+ ४ = ४१ | ६१७.००<br>१११९.०० | ६८५३६७/-<br>३७६८६७/- | ३०८४९९/- | ६८३६८/- | मंजूर |
| ११. | -"- | अ | २५८-सी, जहांगीर बोमन बेहराम मार्ग, (बेलासिस रोड), मुंबई | प.टप्पा सुधा. मंडळ | तळ + १<br>४ + ०= ४ | ५८२.३४<br>१०२०.३४ | ५९४२९८/-<br>५९४२९८/- | ५८२३४०/- | ११९५८/- | -"- |
| १२. | -"- | -"- | २५८-डी, जहांगीर बोमन बेहराम मार्ग, (बेलासिस रोड), मुंबई | प.टप्पा सुधा. मंडळ | तळ + १<br>४ + ०= ४ | ५८२.३४<br>९७३.४० | ५६६८६०/-<br>५६६८६०/- | ५६६८६०/- | -- | -"- |
| १३. | -"- | -"- | ३७, बद्रुदीन हाऊस, नेसबीट रोड, माझगांव, मुंबई | प.टप्पा सुधा. मंडळ | तळ + ३<br>३६+ ४= ४० | १७७९.४४<br>९०३.९५ | १६०८५२४/-<br>१६०८५२४/- | १६०८५२४/- | -- | -"- |
| १४. | -"- | -"- | ९३-९५, भारत भुवन, रामभाऊ भोगले मार्ग, घोडपदेव, मुंबई | चौ.टप्पा सुधा. मंडळ | तळ + ३<br>६९+ ४= ७३ | १६०३.४०<br>९७५.२२ | १५६३२८०/-<br>१०३०४००/- | १०३०४००/- | -- | -"- |
| १५. | -"- | -"- | १२-१८, चापशी भिमजी मार्ग, माझगांव, मुंबई | चौ.टप्पा सुधा. मंडळ | तळ + ४<br>३६+ ५ = ४१ | १०३४.५२<br>९८३.५० | १०१७४५६/-<br>५४९१२३/- | ५४९१२३/- | -- | -"- |
| १६. | -"- | -"- | ४१-४७, क्लेअर रोड, नागपाडा, मुंबई | दु.टप्पा सुधा. मंडळ | तळ + २<br>४३+ ११= ५४ | ३४११.०८<br>५८४.५३ | १९९३८४०/-<br>१५८४५१६/- | १५८४५१६/- | -- | -"- |
| १७. | फ.ग/द | अ | १६, ला संता मारिया, वासुदेव पेडणेकर मार्ग (सेंट झवेरियर स्ट्रीट), नायगांव, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ ३<br>१६+ ० = १६ | १३२३.८६<br>६००.४५ | ७९४९२३/-<br>७०३९२५/- | ७०३९२५/- | -- | -"- |
| १८. | -"- | -"- | १५३, शांता दुर्गा (आशा निवास), सेंट पॉल स्ट्रीट, मुंबई | तिसरा टप्पा मंडळ | तळ+२<br>१० + १ = ११ | ६३८.९४<br>९२९.६९ | ५९४०२१/-<br>१७९३४०/- | १७९३४०/- | -- | -"- |
| १९. | -"- | -"- | खिमजी नागजी चाळ नं.८, सेनापती बापट मार्ग, मुंबई | चौथा टप्पा मंडळ | तळ+२<br>९१ + ० = ९१ | १६५९.०९<br>९६७.०५ | १६०४४३६/-<br>४०६८३९/- | ४०६८३९/- | -- | -"- |
| २०. | -"- | -"- | २८-बी, धनमिल चाळ, न्यु प्रभादेवी रोड, मुंबई | चौथा टप्पा मंडळ | तळ+१<br>४२ + ० = ४२ | ७४७.००<br>९७१.८४ | ७२५९६५/-<br>३७९५६७/- | ३७९५६७/- | -- | -"- |

698

12794315

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१. | फ.ग/द | -"- | निर्मला निवास, सी ब्लॉक, आई माई मेरवानजी स्ट्रीट, मुंबई | ति.टप्पा सुधा. मंडळ | तळ+५<br>१०८ +०=१०८ | ३३४०.२७<br>१०१४.२२ | ३३८७७९६/-<br>२८२३४१३/- | २७७५८८७/- | ४७५२६/- | मंजूरा |
| २२. | फ.ग/उ | अ | ४, इक्बाल मंझील, कापड बाजार, माहिम, मुंबई | पहिला टप्पा मंडळ | तळ+ १<br>५+ ० = ५ | १४४.००<br>८५९.०४ | १२३७०२/-<br>१२३७०२/- | १२३७०२/- | -- | -"- |
| २३. | -"- | ब | ६१, पारेख चेंबर्स, आर.ए. किडवाई मार्ग, मुंबई | पहिला टप्पा मंडळ | तळ+२+भाग ३<br>११ + ० = ११ | ७३५.२२<br>४९५.३६ | ३६४२०५/-<br>३६४२०५/- | ३६४२०५/- | -- | -"- |
| २४. | -"- | अ | ८, विरा विहार, गणेशपेठ लेन, दादर, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ + २<br>६ + १= ७ | २८०.८७<br>९७३.४७ | २७३४२१/-<br>२२५२१९/- | २२५२१९/- | -- | -"- |
| २५. | -"- | -"- | ३१, कमला भवन, केळुसकर मार्ग, दादर, मुंबई | पहिला टप्पा मंडळ | तळ+ ३<br>७ + ० = ७ | ७३५.५९<br>६८६.३६ | ५०४८८६/-<br>५०४८८६/- | ५०४८८६/- | -- | -"- |
| २६. | -"- | -"- | २०६, अंबाबाई मिस्त्री बिल्डींग, सेनापती बापट मार्ग, दादर, मुंबई | तिसरा टप्पा मंडळ | तळ+ ४<br>१२ +१६ =२८ | ११६१.७६<br>६९३.८२ | ८०६०५५/-<br>५५१८९१/- | ५५१८९१/- | -- | -"- |
| २७. | -"- | -"- | १४५-१४५अे, लिव्हीयन हाऊस, एल.जे.रोड, माहिम, मुंबई | तिसरा टप्पा मंडळ | तळ+ ३<br>१६ + ८ = २४ | ९४०.५१<br>८९५.४४ | ८४२१७७/-<br>४९५७९८/- | ४९५७९८/- | -- | -"- |
| २८. | -"- | -"- | २३७४(ई), जमनादास चाळ, डंकन कॉजवे रोड, सायन, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळमजला फक्त<br>२२ + ० =२२ | ४४७.५३<br>९८६.०८ | ४४१३०३/-<br>३०२१६२/- | ३०२१६२/- | -- | -"- |
| २९. | -"- | -"- | १६-२०, गोपाळ भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई | दुसरा टप्पा मंडळ | तळ+ २<br>२८ +२५ =५३ | १५२०.००<br>५५६.७५ | ८४६२६५/-<br>६७७०४७/- | ६७७०४७/- | -- | -"- |
| ३०. | -"- | -"- | ९८-१००, कांटावाला बिल्डींग क्र.२ (बालाजी बिल्डींग),नायगांव क्रॉस लेन, दादर,मुंबई | चौथा टप्पा मंडळ | तळ+ ३<br>२१ + ७ = २८ | १४४७.७२<br>१००५.०९ | १४५५१०२/-<br>४२२३९५/- | ४१५०१३/- | ७३८२/- | -"- |
| ३१. | -"- | -"- | १५०, काद्री मेन्शन, एल.जे.रोड, माहिम, मुंबई | दु.टप्पा सुधा मंडळ | तळ+ ४<br>१९ + ५ = २४ | ११८३.१७<br>९८७.७८ | ११६८७२२/-<br>१०९७१२६/- | १०९७१२६/- | -- | -"- |
| ३२. | -"- | -"- | ८१, ॲव्हेन्यू बिल्डींग, वीर सावरकर मार्ग, माहिम, मुंबई | प.टप्पा सुधा मंडळ | तळ+ ३<br>१४ + ५ = १९ | ८०७.८०<br>१०००.१२ | ८०७८९६/-<br>८०७८९६/- | ८०७८००/- | ९६/- | -"- |

10 34

2,11,90,055

## परिशिष्ट - ब

## मंडळाच्या दिनांक ४/१०/२००२ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यात आलेल्या दक्षिण परिमंडळातील अंदाजपत्रकांची यादी.

### अ विभाग

| अ.क्र | इमारतीचा तपशिल | दुरूस्तीचा टप्पा मंडळ/नाहप्र | मजल्यांची संख्या | इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ / दुरुस्तीचा दर | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम | निव्वळ टप्प्याची रक्कम | रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेतील | रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेपेक्षा अधिक असलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | १-३-३ए एच. बॅरो रोड, सर्जट हाऊस | तिसरा मंडळ | तळ + ४ व तळ + ७ / २९ + १ = ३० | ३७६२.०० / ६८२.२१ | २५६६४७७.०० | १३९८८५९.०० | १३९८८५९.०० | — | मंजूर |
| २. | ३१३ शहिद भगतसिंग रोड, कालिकत स्ट्रीट | चौथा मंडळ | तळ + ३ / २१ + ७ = २८ | ६९७.१६ / १२१०.९८ | ८४४२५३.०० | ३६५४५४.०० | २१८३६७.०० | १४७०८७.०० | मंजूर |
| ३. | ११७ पेरिन नरिमन स्ट्रीट | दुसरा मंडळ | तळ + ४ / ३ + २ = ५ | ३८८.०० / १००१.१७ | ३८८४५५.०० | ३१६६०८.०० | ३१६१५४.०० | ४५३.०० | |

### ब विभाग

| अ.क्र | इमारतीचा तपशिल | दुरूस्तीचा टप्पा मंडळ/नाहप्र | मजल्यांची संख्या | इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ / दुरुस्तीचा दर | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम | निव्वळ टप्प्याची रक्कम | रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेतील | रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेपेक्षा अधिक असलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | २४१-२४३ नागदेवी स्ट्रीट | तिसरा मंडळ | तळ + ५ / ११ + २ = १३ | ७८५.०० / ८०९.०६ | ६३५११९.०० | २४५४८८.०० | २४५४८८.०० | - | मंजूर |
| ५. | २३१-२३५ नागदेवी स्ट्रीट/ १४५ जंजीकर स्ट्रीट | पहिला मंडळ | तळ + २ / २ + ५ = ७ | २७२.२८ / ९९७.२७ | २७१५३७.०० | २७१५३७.०० | २७१५३७.०० | - | मंजूर |
| ६. | २१ शायदा मार्ग/ २१, डोंगरी स्ट्रीट | दुसरा/सु. मंडळ | तळ + ४ / ४० + ७ = ४७ | १३३५.३७ / १०२७.०० | १३७२४००.०० | ५३२०१८.०० | ५३२०१८.०० | - | मंजूर |
| ७. | ८०-८४ नंदलाल जानी मार्ग | तिसरा/सु मंडळ | तळ + ४ / ११ + ३० = ४१ | १८५४.०० / ९९८.२० | १८५०६६३.०० | ९७६९३०.०० | ९७६९३०.०० | - | मंजूर |
| ८. | १६ अे मिर्झा अली स्ट्रीट | दुसरा मंडळ | तळ + २ / १२ + १ = १३ | ४५९.३५ / ९४६.७७ | ४३४९००.०० | ३३५९२६.०० | ३३५९२६.०० | - | मंजूर |

1218 4140420

| | | | | | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

## सी-३/४ विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९. | १८ गझधर स्ट्रीट | दुसरा / नाहप्र | तळ + ४ / ९ + १ = १० | ७१२.१६५ / १००८.९६ | ७१८५५१.०० | ३०३७८९.०० | २८४६०८.०० | ६३८६.०० | मंजूर |
| १०. | ४१३ एफ काळबादेवी रोड | दुसरा (सु) / मंडळ | तळ + ४ / ६ + ३७ = ४३ | १३५२.०० / ९९१.०२ | १३४०१५९.०० | १०९००४८.०० | १०९००४८.०० | - | मंजूर |
| ११. | ५६४-५६२ जे. एस. एस. मार्ग | तिसरा/सु / मंडळ | तळ + ५ / १२ + ११ = २३ | ३२४८.०० / ९९५.३६ | ३२३२९४४.०० | २१७३४४४.०० | २१७३४४४.०० | - | मंजूर |
| १२. | ५७८ अ जे. एस. एस. रोड | चौथा / मंडळ | तळ + ४ / २० + ०= २० | ५५१.८५ / ९९९.७२ | ५५१७०१.०० | १५४०५९.०० | १५४०५९.०० | - | मंजूर |

## डी-१ विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३. | ५८ सी वाळकेश्वर मार्ग | दुसरा / मंडळ | तळ + ३ / ३० + ० = ३० | १२०५.२७ / ८७३.३३ | १०५२६०७.०० | ९९१०२२.०० | ९९१०२२.०० | - | मंजूर |
| १४. | ३५ डी/१९ मुगभाट क्रॉस लेन | दुसरा / नाहप्र | तळ +२ / १० + २ = १२ | ४५०.८१ / १००७.११ | ४५४०१९.०० | ३९२०१९.०० | ३९२०१९.०० | - | मंजूर |
| १५. | २०४ बाबासाहेब जयकर मार्ग | पांचवा / मंडळ | तळ +४ / ६५ + २० = ८५ | ३२५०.०० / ९८५.३१ | ३२०२२७६.०० | ९०२२७६.०० | ९०२२७६.०० | - | मंजूर |
| १६. | ४१-४३-४५ जे. एस.एस. मार्ग | चौथा / मंडळ | तळ + २+ ॲटीक / १८ + ८ = २६ | ४७२.०० / ८८६.६३ | ४१८४८८.०० | ११८४८८.०० | ११८४८८.०० | — | मंजूर |
| १७. | ६६ इ ऑगष्ट क्रांती मार्ग | दुसरा/सु / मंडळ | तळ + १ / १३ + ० = १३ | ६३०.०० / ९९१.६४ | ६२४७३४.०० | ६०४४३४.०० | ६०४४३४.०० | - | मंजूर |
| १८. | २६२ अे बी. वाळकेश्वर मार्ग | तिसरा/सु / मंडळ | तळ +४ / ३३ + २० = ५३ | १८९७.५८ / ९९५.९८ | १९५३३५५.०० | १०२३३५५.०० | १०२३३५५.०० | - | मंजूर |

1533

4,893354

69

| | | | | | | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **डी-२ विभाग** | | | | | | | | | |
| १ | ४ फोर्जेट स्ट्रीट (जेर मॅन्शन) | पहिला मंडळ | तळ ±३ ४+ ० = ०४ | ६९२.०८ / ६१९.७० | ४२८८८६.०० | ४२८८८६.०० | ४२८८८६.०० | ० | मंजूर |
| १९. | २७३ डी. जावजी दादाजी मार्ग | दुसरा/ नविन टप्पा मंडळ | तळ ±३ ९+ ० = ०९ | १०६३.८४ / ४८६.२० | ५१७२४९.०० | ४६७२४९.०० | ४६७२४९.०० | ० | मंजूर |
| २०. | ७ नसरवानजी पेटीट स्ट्रीट | तिसरा मंडळ | तळ ±३ ९+ ० = ०९ | ७६९.७८ / १९३५.५८ | १४८९९७५.०० | ११५६९१८.०० | ४३६७२२.०० | ७२०१९६.०० | मंजूर |
| २१. | १७७ खेतवाडी | दुसरा/सु मंडळ | तळ ±३ १०+ ० = १० | १२५५.८० / १०३९.०५ | १३०४८४३.०० | ९२७८८८.०० | ८७८७४५.०० | ४९०४३.०० | मंजूर |

1565

1,48,74295